॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 25 ( ) संशोधकांनी शोधनिबंधाची संख्या वाढविण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण शोधनिबंध लिखाणावर भर द्यावा असे आवाहन प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्र व स्प्रींगर नेचर यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. 25 सप्टेंबर, 2018 रोजी ` स्प्रींगर नेचर-युजर अवेअरनेस प्रोग्राम` या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्रा.माहुलीकर बोलत होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी होते.

प्रा.माहुलीकर यांनी संशोधकांना ई-लायब्ररी तसेच ग्रंथालये यांचा वापर करुन संशोधन अधिक चांगले व सकस करावे असे आवाहन केले. प्रास्ताविकात ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ.अनिल चिकाटे यांनी कार्यशाळा आयोजना मागील भूमिका विशद केली. स्प्रींगर नेचरचे प्रतिनिधी रेघू के आणि अल्पना सेगवाल यांनी स्प्रींगर नेचरच्या वतीने शिक्षक व संशोधकांसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची सविस्तर माहिती दिली. स्प्रींगर नेचरसाठी संशोधन पेपर सादर करणाऱ्या पाच उत्कृष्ट संशोधकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रा.सतिष पाटील, प्रा.ए.एम.महाजन, प्रा.मनिष जोशी, प्रा.जे.बी.नाईक आणि प्रा.रत्नमाला बेंद्रे यांचा समावेश होता. शेवटी डॉ.चिकाटे यांनी आभार मानले. या कार्यशाळेत 275 प्रतिनिधी सहभागी झाले होते.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक :25 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी